

# कैच्याकै

बंड्याचे बाबा (रागाने) – तू शेजाऱ्याच्या जोशी काकूंना वेडेवाकडे बोललास म्हणे ! तुला हेच शिकवले होते का ?
बंड्या – तुम्हीच म्हणाला होतात न कि जर आपण एखादी गोष्ट करत असलो आणि शेजारी आले तर त्यांना बोलावयाचे. जेवत असलो तर जेवायला बोलावयाचे. चित्रपट बघत असलो तर चित्रपट बघायला बोलावयाचे.
बंड्याचे बाबा – हो. पण त्याचे इथे काय ?
बंड्या – काळ दुपारी शेजारच्या जोशी काकू आल्या होत्या तेंव्हा मी झोपलो होतो.

एकदा एक माणूस मॅक डॉनल्ड्स मधे जातो. काउंटर वरुन एक 'मॅक व्हेजी' घेतो आणि टेबलपाशी येऊन बसतो. बसल्यावर बर्गरमधलं सगळं सॅलड काढून उरलेला बर्गर खाऊ लागतो. तेवढ्यात तिथला एक वेटर त्याच्याजवळ येतो.
वेटर : साहेब, तुम्ही पोलिस आहात ना ?
साहेब : अगदी बरोबर ! तू कसं ओळखलंस ??
वेटर : तुम्ही युनिफ़ॉर्म घातला आहे !

शिक्षक – एका आंब्याच्या झाडावर ७ पेरू होते त्यातले ३ चिकू पडले तर किती कलिंगडे राहिली ???
बंडू – फक्त हिरव्या रंगाची...
शिक्षक – अगदी बरोबर.. तू कसे ओळखलेस?
बंडू – कारण मी आज डब्यात खिचडीभात आणला होता...

पेरुच्या झाडावर हत्ती बसलेला.एक गाढव झाडावर चढत.
हत्ती: कशाला आला??
गाढव: सफ़रचंद खायला.
हत्ती: मुर्खा, हे पेरुच झाड आहे.
गाढव: महामुर्खा, मी सफ़रचंद सोबत घेउन आलोय...

अलिबाबा गुहा शोधायला चालत निघतो,
चालून चालून खूपच दमतो, चालता चालता शेवटी एकदाची गुहा येते...
तर तो काय म्हणेल...
.....आली बाबा!

झम्प्या व चम्प्या हॉस्पिटल मध्ये एकमेकांना भेटतात. चम्प्या रडत असतो.
झम्प्या त्याला विचारतो, "काय रे का रडत आहेस?"
चम्प्या म्हणतो, "माझी आज ब्लड टेस्ट होती."
… झम्प्या म्हणतो, "मग?"
चम्प्या म्हणतो, "त्यांनी माझा बोट कापलं."
हे ऐकताच झम्प्या एकदम रडायला लागतो. चम्प्या त्याला म्हणतो,
"आता तुला काय झाला रडायला?"
झम्प्या म्हणतो, "माझी आज युरीन टेस्ट आहे!"

एकदा झम्प्या खचाखच गर्दीने भरलेल्या बस मध्ये बसला होता.त्याच्या शेजारी एक आजी उभी होती.
तिने झम्प्याला हाक मारली, त्याच्या हातात बदाम ठेवले आणि म्हणाली"खा हो बाळ" झम्प्याने ते लगेच मटकावले.असं वारंवार झाल्यावर तो म्हणाला,"ओ आजी, असे बदाम का वाटताय, तुम्ही का नाही खात?"
आजी म्हणाली,"दात पडले रे माझे सगळे" "अहो मग बदाम विकतेताच का?"
हातातला चॉक्लेटचा पुडा नाचवत आजी म्हणाली,"त्यांच्या भोवतीचं चॉकलेट तर चघळता येतंच ना मला!"

संता लायब्रीत जातो आणि काउंटरपलिकडील गोड मुलीस सांगतो कि मला Psyco The Rapist हे पुस्तक हवे आहे. ती गोड मुलगी तत्परतेने जावुन सगळी लायब्री धुंडाळते. १५-२० मिनिटाने ती चिडुन संताकडे येते आणि त्याच्या जोरात कानाखाली मारते. आणि त्याला सांगते त्या पुस्तकाचे नाव Psycotherapist असे आहे.

पहिला मुलगा – माझे बाबा एव्हढे उंच आहेत की ते उडत्या हेलिकॉप्टरला किस करू शकतात!
दुसरा मुलगा- माझे बाबा पण खूप उंच आहेत, पण ते असले चीप चाळे करत नाहीत!

तीन मुंग्या असतात, त्यांना एक केक दिसतो.
पहिली मुंगी जाते आणि केक खायला लागते. दुसरी पण जाते आणि केक खायला लागते...
पण तिसरी मात्र जात नाही, का?
ती म्हणते, "शी, केकला मुंग्या लागल्यात!"

एकदा संता इंग्लंड्च्या राणीबरोबर तिच्या शाही घोड्यांच्या तबेल्यामध्ये फ़िरत असतो.[कसा काय त्यालाच माहीत]
तर तेवढ्यात तिथला एक घोडा जोरात पादतो.
राणी ब्रिटिश शिष्टाचाराप्रमाणे म्हणते ,"ओह आय ऍम सॉरी "
तेव्हा संता म्हणतो, "इट्स ओके.मला वाट...ले ... घोडा पादला !"

चांदनी रात थी, नदी का किनारा था
आसमान मे तारों का नजारा था
प्रेमी प्यार से हौले हौले मुस्कुराते हुए
अपने प्रेमिका से बोला, "शेवंते, बिडी पिशील काय?"

बाई: गंपू, 'माझा कुत्रा' या विषयावरचा तुझा निबंध अगदी झंपूच्या निबंधासारखाच आहे?
गंपू: 'बाई, आम्ही एकाच कुत्र्यावर निबंध लिहिलाय!

वयात आलेला झंप्या शाळेतून just आलेला असतो.
तो त्याच्या बाबांना सांगतो, " बाबा..आमच्या नवीन शिक्षिका ...खूप खूप.....म्हणजे खूपच सुंदर आहेत...."
बाबा झम्प्याला म्हणतात," अरे झंप्या....तुझी शिक्षिका तुझ्या आई सारखी आहे....असं बोलू नये..."
झंप्या लगेच बोलतो,,," बाबा ...तुमचं हे नेहमीचं आहे हं! जिथे तिथे तुम्ही तुमचीच सेटिंग लावता.

त्सुनामी पासून वाचण्याचा हमखास उपाय कोणता ?
शांतपणे उभे रहा. एक हात त्सुनामीच्या दिशेने रोखा आणि म्हणा,
"निरमा, निरमा, washing powder, निरमा "

जर जगातले सगळे देश बायकांनी चालवलेले असते, तर कधीच युद्ध झाली नसती...
फक्त काही एकमेकांशी अबोला धरलेले देश असते!

एकदा एका माणसाला एक आख्खं कुटुंब नुसतं गवत खाताना दिसतं.
माणूस: हे काय गवत का खाता?
कुटुंबप्रमुख: आम्ही गरिब आहोत. खायला काही विकत घ्यावं एवढे पैसे नाहीत आमच्याकडे.
माणूस: अरेरे! चला, माझ्या घरी चला. तुमची उत्तम सोय करतो.
कुटुंबप्रमुख: खूप उपकार झाले झाले साहेब. तुम्ही आमच्यासाठी खाण्यापिण्याची व्यवस्था केली. तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही.
माणूस: छया! त्यात उपकार कसले. माझ्या घराच्या बागेत चांगलं दीड दीड फूट गवत वाढलंय. तुमच्या आख्ख्या कुटुंबाची सोय होईल तिकडे.

स्त्री आणि वर्तमानपत्र यांच्यात साम्य काय?
दोघांनाही तयार व्हायला खूप वेळ लागतो आणि दोघांकडे सगळ्याची खबरबात असते!!

झम्प्याची लाडावलेली गर्लफ्रेंड .....
एकदम धावत पळत त्याच्याकडे येते आणि म्हणते: " झम्पू...मी माझी पर्स घरी विसरलेय आणि मला आता लगेच एक हजार रुपये लागतात.. please मला एक हजार रुपये दे ना लगेच...."
झंप्या मस्तपणे पाकीट काढतो ...आणि तिच्या हातात ५० रुपये ठेवून म्हणतो:
" जा .....रिक्षाने घरी जाऊन पर्स घेऊन ये "

कितीही भांडण झाले तरी त्यात प्रेम असते ...

किती‍ही भांडण झाले तरी त्यात प्रेम असते ...
आणि कधीही Sony लावले तरी CID च चालू असते !!

वधु : थांबा.!!!!........अज्जिबात जवळ येऊ नका !.....मला स्पर्श सुद्धा करू नका!
वर : पण का?........काय झालं?
वधु : मी आईला प्रॉमिस केलं आहे ........ लग्नानंतर हे सर्व बंद करेन म्हणून!

एक सुंदर अभिनेत्री बोटीने लांबची समुद्रसफ़र करण्यास निघाली.
तिने बोटीवर असताना लिहीलेल्या दैनंदिनीतील काही भाग -
दि. ०७ ऑक्टोंबर - प्रवासास आरंभ झाला. बोटीत १५०० प्रवासी आहेत. डेकवर फिरताना जहाजाच्या कप्तानाशी ओळख झाली.
दि. ०८ ऑक्टोंबर - आज मी आणि कप्तान डेकवर खूप वेळ एकत्र फिरलो. आम्ही खूप गप्पा मारल्या.
दि. ०९ ऑक्टोंबर - कप्तानाशी दोस्ती खूपच वाढली.
दि. १० ऑक्टोंबर - कप्तानाने मला त्याच्या केबिनमध्ये रात्री झोपायला बोलावले.
दि. ११ ऑक्टोंबर - मी कप्तानाच्या सूचनेला स्पष्ट नकार दिला.
दि. १२ ऑक्टोंबर - कप्तान म्हणाला,"तू आज रात्री आली नाहीस तर मी सारी बोट बुडवून टाकीन."
दि. १३ ऑक्टोंबर - काल रात्री मी १५०० प्रवाशांचे प्राण वाचविले.

बंड्रू दोन दिवसांनी शाळेत येतो.
गुरुजी: काय रे बंड्रू, दोन दिवस शाळेत का आला नाहीस?
बंड्रू: गुरुजी माझी शाळेची चड्डी ओली होती आणि माझ्याकडे दुसरी चड्डी नाही.
गुरुजी: चड्डी सुकायला दोन दिवस लागले काय?
बंड्रू: नाही, मी काल शाळेत यायला निघालो पण तुमच्या घराबाहेर तुमची पॅंट वाळत होती ती बघून मी पुन्हा घरी गेलो.

प्रसिद्ध विदेशी कवी व्हॉल्टेअर कडे एकदा एक नवोदित कवी गेला. त्याने त्याला आपले काव्य ऐकविले. मग तो ऐटीत म्हणाला,"या काव्याचे एक वैशिष्ट्य आहे. यात कुठेही जी (G) हे अक्षर नाही". तसे व्हॉल्टेअर ने ते काव्य पुन्हा एकदा चाळले व तो म्हणाला,"मला वाटते यातील इतर अक्षरेही काढून टाकली तर बहार येईल."

अमेरिकेत मुक्त लोकशाही तर रशियात कम्यूनिस्टांची हुकूमशाही होती तेव्हाची गोष्ट. एकदा एक अमेरिकन एका रशियनाला चिडवण्यासाठी मोठ्या ऐटीत म्हणाला,"मी केव्हाही व्हाईट हाऊस मध्ये जाऊन अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना शिव्या देऊ शकतो. इतकं स्वातंत्र्य आहे आम्हाला."
यावर रशियन म्हणाला,"मग त्यात काय एवढं मोठंसं? व्हाईट हाऊसमध्ये जाऊन अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना शिव्या देण्याचं स्वातंत्र्य तर मलाही आहे."

एकदा एक जर्मन एका इंग्रजाला म्हणाला,"जर्मनीत आभिमान बाळगण्यासारख्या दोन गोष्टी आहेत."
इंग्रजाने विचारले,"त्या कोणत्या?"
जर्मन म्हणाला,"एक जमिनीत असलेली खनिज संपत्ती आणि दुसरी जमिनीच्या वर असणारा फ़्यूरर - हिटलर."
त्यावर इंग्रज शांतपणे म्हणाला,"खरं आहे. पण ह्या गोष्टींच्या जागांची उलटापालट झाली असती तर आधिक बरं झालं असतं."

एकदा तीन आत्मे एकाच वेळी यमलोकात पोचले. तेथील कारकून म्हणाला,"तुम्ही एकेक जण इथे कसे आलात ते सांगा."
पहिला आत्मा म्हणाला," दुपारी मी कार्यालयात असताना मला दूरध्वनी करून कोणीतरी सांगितले - तुमच्या पत्नीचा प्रियकर तुमच्या घरात आहे. मी तडक घरी जाऊन पाहिलं. घरात दुसरा कुणी माणुस नव्हता. मला वाटलं, माझी चाहूल लागताच तो पळून गेला असावा, म्हणून मी खिडकीतून खाली वाकून पाहिलं. खालून एक तोकडी चड्डी घातलेला इसम पळत जात होता. तोच माझ्या पत्नीचा प्रियकर असला पाहिजे असा विचार करून मी घरातून एक जड ट्रंक घेतली आणि खिडकीतून त्या माणसाच्या डोक्यावर फ़ेकली. त्याबरोबर तो मेला. मला फ़ाशी देण्यात आलं आणि मी इथं आलो."
दुसरा आत्मा म्हणाला,"डॉक्टरांनी मला पळण्याचा व्यायाम घेण्याचा सल्ला दिला होता. दुपारी गर्दी कमी असते म्हणून मी रस्त्याच्या कडेने घरांच्या भिंतीच्या सावलीतून अर्धी चड्डी घालून पळण्याचा व्यायाम घेत असे. एक दिवस पळताना माझ्या डोक्यात जड ट्रंक पडल्याने माझा मृत्यू झाला आणि मी इथे आलो."
तिसरा आत्मा म्हणाला,"मी त्या ट्रंकेत होतो."

पांडू हवालदार हा भलताच तडफ़दार. दिलेले काम अतिशय चोख आणि अत्यंत निष्ठेने करणारा. पण आपले कर्तव्य बजावत असताना अनेकदा तो त्याच्या आधिकाराची मर्यादाही ओलांडत असे आणि त्यामूळे गोत्यात येत असे. शहरात जकातचोरीचे प्रमाण वाढल्याची महापालिकेची तक्रार आल्यावर पोलीस आयुक्तांनी पांडुला खास जकातचोरी रोखण्यासाठी तैनात केले. पण त्याच बरोबर त्याला फ़ाजील उत्साहाला आवर घालण्याची आणि नियमांच्या कक्षेत राहूनच काम करण्याची सूचना करायलाही ते विसरले नाहीत.
संध्याकाळच्या वेळी नाक्यावर उभा असताना जकात नाक्यावर न थांबता निघालेला एक टेम्पो पांडूने हेरला. चालकाला टेम्पो बाजूला घेऊन माल दाखविण्याची त्याने सूचना केला. भीत भीत चालकाने मागची ताडपत्री काढली. आत पांडूने पाहिले तर - पुर्ण गाडी भरून दारूगोळा व बंदुका होत्या. आता आपली शंभर वर्षे भरली या भीतीने चालकाने पांडुकडे पाहिले. तसा पांडू म्हणाला,"या सामानाच्या किंमतीच्या चार टक्के जकात आणि जकात बुडवून चालल्याबद्दलचा दहा पट दंड एवढी रक्कम नाक्यावर भरून पावती घेऊन ये, मग तुझा टेम्पो सोडतो."

अमेरिकन टूरिस्टांविषयी बरेच विनोद फिरत असतात. एकदा म्हणे असाच एक अमेरिकन प्रवासी त्याच्या बायकोबरोबर इस्रायलमध्ये एके ठिकाणी बसला असताना एक अरब सेल्समन त्यांच्याजवळ आला. आपल्याकडच्या वस्तूंचं सेल्स टॉक करूनही त्या जोडप्यानं त्याच्यात काहीच रस न दाखवल्यानं शेवटी त्यानं त्या अमेरिकनाला विचारलं, 'तुम्ही कुठचे?' तो म्हणाला, 'अमेरिका.' त्याच्या बायकोच्या काळ्या केसांकडे आणि ऑलिव्ह रंगाच्या त्वचेकडे बघून तो सेल्समन म्हणाला, 'पण ही नक्कीच अमेरिकन नाही.' 'मीही अमेरिकनच आहे,' ती म्हणाली. मग सेल्समननं तिच्याकडे बघून विचारलं, 'हा तुझा नवरा का?' ती म्हणाली, 'हो.' मग त्या अमेरिकनाला तो म्हणाला, 'तू तिला मला विकलस तर मी तुला शंभर उंट देईन.' नवरा बराच काळ शांत बसला. शेवटी विचार करून म्हणाला, 'ती विक्रीसाठी नाहीये.' तो सेल्समन निघून गेल्यावर बायकोनं हसत हसत त्याला विचारलं, 'तू उत्तर द्यायला एवढा वेळ का घेतलास?' त्यावर तो म्हणाला, 'ते शंभर उंट अमेरिकेला सहजपणे नेता येतील का याचा मी विचार करत होतो.' यावर बायकोचा चेहरा बघण्यासारखा झाला, हे सांगायला नकोच.

लोकसभेतील निवडणूकींविषयी संपादक लिहीतात : -
'एखादा चांगला उमेदवार निवडून काढणे हे अतिशय अवघड काम आहे. उडदामाजी काळे गोरे काय निवडावे? चांगला उमेदवार निवडणे हे वाळूचे कण रगडून तेल काढण्याइतके, अथवा वांझेच्या पोरीला षंढापासून झालेल्या कर्णबधिर मुलाला मुक्याचे गायन ऐकविण्याइतके अवघड आहे.'

एकदा सरदार माखनसिंग जवानांची परेड घेत होता. मध्येच त्याने हुकूम दिला,"सर्वांनी आपला डावा पाय वर घ्या." एका नवख्या जवानाने गोंधळून उजवा पाय वर घेतला. माखनसिंग सर्व जवानांच्या पायाकडे निरखून पाहू लागला. उजवा पाय वर केलेल्या जवानाकडे लक्ष जाताच तो गरजला,"दोन्ही पाय वर करून कोण उल्लू उभा आहे?"Aug 6DeleteUndo

उन्हाळा सुरू झाल्यावर सरदारजींनी आपल्या नोकराला माठ आणण्यास सांगितले. नोकराने माठ आणून तो उपडा ठेवला व तो निघून गेला. थोड्या वेळाने सरदारजीने तो माठा पाहिला व म्हणाला,"अरेच्च्या! हा नोकर वेडाच दिसतोय, याने माठ तर आणलाय पण त्यात पाणी भरायचं तरी कुठून?" असं बोलता बोलता त्याने तो माठ उचलून हातात घेतला आणि मग डोक्याला हात लावून म्हणाला,"समजा, पाणी भरलंच तरी ते खालच्या भोकातून सारं वाहूनच जाईल."

प्रसिद्ध नाटककार जॉर्ज बर्नाड शॊ यांच्या नाटकाचा अमेरिकेत प्रयोग झाला. त्यावेळी नाटकातील नायिकेचे काम खुपच गाजले.
जॊर्ज बर्नाड शॊंनी त्या अभिनेत्रीला लगेचच तार केली - 'वा! सुंदर, फ़ारच छान!'
त्यामूळे भारावून गेलेल्या त्या अभिनेत्रीने नम्रतेने शॊ यांना उलट तार धाडली - 'इतकी तारीफ़ करण्याजोगे नक्कीच नाही.'
ती तार वाचून जन्मजात खोडकर असलेला शॊं यांचा स्वभाव उफ़ाळून आला. त्यांनी पुन्हा त्या अभिनेत्रीला तार धाडली - 'मी तुमच्या अभिनयाविषयी नव्हे तर माझ्या लिखाणाविषयी म्हंटले होते.'
ती तार वाचून शॊंची खोड मोडण्यासाठी त्या अभिनेत्रीने पुन्हा तार केली - 'मीही माझ्या अभिनयाविषयी नव्हे तर तुमच्या लिखाणाविषयीच तार केली होती.'

भाडेकरू:- अहो मालक रात्रभर खोलीत उंदीर नाचतात..
मालक:- मग १५० रूपये भाड्यात काय सुरेखा पुणेकरला नाचवू का?

गणपतराव अग्नीशामक दलात नोकरीस होते. एकदा ते आपल्या घरी रात्री झोपले असता त्यांना अचानक अग्नीशामक दलातून आग

विझविण्यासाठी पाचारण करण्यात आले. ते निघाले असता पत्नीने त्यांना केव्हा येणार असे विचारले. तेव्हा आग मोठी आहे विझवेपर्यंत सकाळ होईल असे त्यांनी उत्तर दिले.
परंतू आग लवकर आटोक्यात आल्यामूळे गणपतराव रात्री दोन वाजताच परतले. पत्नीची झोपमोड होऊ नये म्हणून Latch Key ने दरवाजा उघडून ते आत आले. दिवा न लावताच अंधारातच त्यांनी आपला गणवेश उतरवला आणि Night Dress परिधान केला. त्यांच्या आवाजाने पत्नी जागी झाली.

पत्नी: तुम्ही तर सकाळी येणार होतात ना मग इतक्या लवकर कसे आलात?
गणपतराव: आग लवकर विझली म्हणून आलो.
पत्नी: बरं झालं आलात, आता लवकर जाऊन आपल्या Chemist कडून औषध घेऊन या. माझे डोके फ़ार दुखत आहे. आणि हो दिवा लावू नका मला उजेड अजिबात सहन होणार नाही.

गणपतरावांनी दिवा न लावता अंधारातच कसाबसा आपला गणवेश शोधला आणि तो परिधान करून ते घराबाहेर पडले. त्यांच्या नेहमीच्या Chemist ला त्यांनी झोपेतून उठविले आणि दुकान उघडायला लावले. त्याने त्यांना हवे असलेले औषध दिले परंतू तो सारखा त्यांना चमत्कारिक नजरेने न्याहाळत होता.
शेवटी जाताना त्याने गणपतरावांना विचारलेच,"का हो अग्नीशामक दलात काम करणारे गणपतराव तुमचे कोण?"
तेव्हा गणपतराव उत्तरले."अहो, तोच की मी."
"अस्सं!" केमिस्ट आश्चर्याने उद्गारला."मग हा पोलीसाचा गणवेश कशाला घातला?"

रघुनाथरावांना एक वाईट खोड होती. त्यांना कोणी कितीही भयंकर घटना सांगितली तरी ते निर्विकार चेहरा करून ऐकून घेत आणि प्रतिक्रियेदाखल म्हणत,"झालं ते चांगलंच झालं; नाहीतर याहून वाईट घडू शकलं असतं."
एकदा अनिल त्यांच्याकडे आला तो फ़ारच रागात होता. रघुनाथरावांनी त्याला विचारले,"काय झाले?"
अनिल: काय सांगू? माझी ही अशी फ़िरतीची नोकरी सोमवारी सकाळी घराबाहेर जातो तो थेट शुक्रवारी संध्याकाळीच घरी परततो. यावेळी अचानक गुरुवारी रात्रीच घरी परतलो. पाहतो तर काय - माझी पत्नी माझा मित्र सुनीलबरोबर .... छे! छे! मला सांगायलाही शरम वाटते. मग काय संतापाच्या भरात मी त्यांच्या डोक्यात दगड घातला. आता पोलिसांपासून लपत फ़िरतोय."
रघुनाथराव: झालं ते चांगलंच झालं; नाहीतर याहून वाईट घडू शकलं असतं.
अनिल (संतापून): आता यापेक्षा आणखी काय वाईट घडू शकलं असतं का?
रघुनाथराव: अरे शांत हो. तू जर गुरुवार ऐवजी बुधवारी रात्रीच घरी आला असतास तर याहून वाईट घडू शकलं असतं. दगड माझ्या डोक्यात पडून मी मेलो असतो.

एक तळिराम आपल्या मित्राला सांगत होता,काल मी ऑफ़िस सुटल्यावर टॉस करत होतो. घरी जाऊ की बारमधे.जर छापा पडला तर घर आणि काटा पडला तर बार.
मित्र-मग.. ?
तळिराम-मग काय काटा पडला आणि मी बारमधे .
मित्र- अरे वा,अगदी तुझ्या मनासारखेच झाले की.
तळिराम- होय तर.फ़क्त त्यासाठी मला १५ वेळा टॉस करायला लागला

एक हौशी पत्रकार एका अपघाताच्या ठिकाणी धडकला पण गर्दीमुळे त्याला प्रत्यक्ष अपघाताची जागा दिसत नव्हती. लगेच त्याच्या डोक्यात आयडिया आली, तो म्हणाला, "बाजूला व्हा, बाजूला व्हा त्या अपघातात मरण पावलेल्याचा मी नातेवाईक आहे." लोकांत आश्चर्याची लाट पसरली. पटकन त्याला रस्ता देण्यात आला. स्वतःच्या युक्तीवर खुश होऊन तो पुढे सरसावला.
समोर एक गाढव मरून पडलं होतं.

'कशी दिली केळी?'
'रुपयाला एक'.
'साठ पैशाला देणार का?'
'साठ पैशात फ़क्त साल देईन.'
'अस्सं, हे घे चाळीस पैसे आणि साल तुझ्याकडेच ठेव.

पहिला: ए जरा माझ्याशी अदबीने बोल. तुला माहितीये, मी या कंपनीचा सी.ई.ओ. आहे.

दुसरा : अरे, तू सी.ई.ओ. आहेस, तर मीही कोणी साधासुधा कर्मचारी नाही. मी डी.ई.ओ. आहे समजलं.
पहिला: सॉरी सर, पण हे डी.ई.ओ. कुठले पद आहे?
दुसरा : अगोदर तू सांग सी.ई.ओ. म्हणजे काय?
पहिला: चीफ़ एक्झिक्युटिव्ह ऑफ़िसर. पण डी.ई.ओ. म्हणजे काय?
दुसरा : डेटा एन्ट्री ऑपरेटर

माझी एक मैत्रीण आता नामवंत अभिनेत्री झाली आहे. अभिनया शिवाय तिचे इतर ही अनेक वैध / अवैध उद्योग आहेत (त्यामूळे तिचे नाव मी इथे लिहीणे योग्य होणार नाही) ज्यातून तिने बरीच माया कमावली आहे. परवा ती तिची नवीन BMW (किंमत रू.५ कोटी फ़क्त) मोटार घेऊन आमच्या घरापाशी आली तेव्हा नेमका मी माझी जुनाट (तिस-या प्रयत्नात) जीप सुरू करीत होतो. मला पाहून ती म्हणाली,
"अरे चेतन! तु तुझा हा जुनाट रणगाडा विकून माझ्या प्रमाणेच अशी नवी BMW का घेत नाहीस?"
तिच्या या प्रश्नावर वैतागून मी तिला म्हणालो, "माझी ही जीप विकून महत्प्रयासाने फ़ार तर लाख रूपये हाती येतील त्यातून ही तुझ्या BMW सारखी महागडी गाडी कशी घेता येईल?" वर तिला दुखविण्याच्या हेतूने मी मुद्दाम मोठ्या आवाजात म्हणालो,
"शेवटी काही झाले तरी हा आमचा घामाचा पैसा आहे. तुमच्यासारखं आमचं थोडंच आहे?"
यावर तीही ठसक्यात म्हणाली,"माझाही पैसा घामाचा आहे म्हंटल!"
"तो कसा काय बुवा?" मी आश्चर्याने विचारले.
त्यावर ती उत्तरली,"म्हणजे बघ असं आहे की आजपर्यंत कुणाचं लक्ष गेलं नाही म्हणून ठीक आहे. पण समजा एखाद दिवशी प्राप्तिकर खात्याने मला विचारलंच की माझ्याकडे एवढा पैसा नेमका कुठून आला, तर काय उत्तर द्यायचं या विचारानेच मला घाम फ़ुटतो."

दोन पुरूष एकत्र आले आणि त्यांनी एक अल्बम काढला जो तुफ़ान लोकप्रिय झाला. त्याचं नाव - 'आयुष्यावर बोलू काही'
समजा दोन स्त्रिया एकत्र आल्या तर काय होईल.... : 'आयुष्यभर बोलु काही' (काहीही)!

बंड्या : आजोबा तुम्हाला राम बोलता येते?
आजोबा : येते ना! तुला काय वाटले माझे दात पडले म्हणून मला बोलता येणार नाही! पण तू हे का विचारतोयस?
बंड्या : काल आई बाबांना म्हणत होती, "म्हातारा कधी एकदाचा राम म्हणतोय कुणास ठाऊक?"

एकदा एका फॉरेनरने मसालेदार भारतीय जेवण खाल्ले. दुसरया दिवशी त्याचे पोट बिघडले. टॉयलेटला जावून वैतागलेला फॉरेनर म्हणाला,
"आज कळल, इन्डियन लोक पाणी का वापरतात, साला टिशु पेपर तर पेट घेईल."

सगळी रात्र मैत्रिणी बरोबर घालवल्यावर सकाळी उठून आळस देताना मंग्याला एक फोटो दिसला.
मंग्या : हा तुझ्या नवरयाचा फोटो का?
मैत्रिणी : नाही.
मंग्या : जुन्या प्रियकराचा ?
मैत्रिणी : नाही.
मंग्या : भावाचा ?
मैत्रिणी : नाही रे सोन्या.
मंग्या : मग कोणाचा ?
मैत्रिणी : माझाच

गुरुजी : गोटया समज तुझ्याकडे १० लाडू आहेत.
गोटया : माझ्याकडे १० लाडू नाही आहेत.
गुरुजी : समज ना. तुझ्या बापच काय जात. बर जाऊ दे.
गुरुजी : बंड्या तू समज तुझ्याकडे १० लाडू आहेत.
बंड्या : माझ्याकडे १० लाडू नाही आहेत.
गुरुजी : समज ना. तुझ्या बापच काय जात. सांग मी तुला अजून ५ लाडू दिले, तर किती झाले?
बंड्या : २० लाडू. गुरुजी : अरे मुर्खा २० कसे.
बंड्या : अहो गुरुजी समजा ना, तुमच्या बापच काय जात.

फोन वाजला आणि डॉक्टर साहेब घाई-घाई ने तयार होऊन निघाले ....
डॉक्टरना घाई-घाई ने जाताना पाहून बायकोने विचारले कुठे चालला आहात.
डॉक्टर : रीगल हॉटेल रूम नंबर ३०२ मधून फोन आला, की लवकर या नाही तर माझा जीव जाईल.
बायको ( लाजत ) : अहो तो फोन तुमच्यासाठी नाही, माझ्यासाठी होता.

गुरुजी : काय रे चिंटू २ दिवस शिकवणीला का नाही आलास?
चिंटू : गुरुजी, माझ्याकडे एकच कुर्ता पायजमा आहे, आणि तो परवा आईने धुतला होता.
गुरुजी : ते ठीक आहे पण काल का नाही आलास?
चिंटू : आलो होतो पण घराबाहेर तुमचा कुर्ता पायजमा वळत घातलेला दिसला, म्हणून परत गेलो.

चिंगुमल मारवाड्याने घरात फर्मान काढल, जो कोणी रात्री जेवणार नाही त्याला ५ रुपये.
पोर पण बापासारखीच चिकट, पैसे घेऊन न जेवताच झोपली. अस ४-५ दिवस झाल्यावर चिंगुमल धास्तावला.
लगेच त्याने दुसरया दिवाशी सकाळी नवीन फर्मान काढल, ' जो ५ रुपये देईल त्याला सकाळी जेवायला मिळेल.'

बायको : तुम्ही बाहेर जाता तेव्हा खूप भीती वाटत रहाते.
नवरा (कौतुकाने): अग पण प्रिये, मी येतो ना लवकर परत.
बायको : त्याचीच तर भीती वाटत राहते.

भिमाकाकू : डॉक्टर, आमच्याकडे अजिबात वेळ नाही, त्यामुळे गुंगीच औषध न देता दाढ काढा.
डॉक्टर : तुम्ही तर बरयाच धीट दिसता, बघू कोणती दाढ?
भिमाकाकू : अहो, या इथे, पटकन दाढ दाखवा.

हवालदार : बाई, तुमची कमाल आहे. न घाबरता तुम्ही त्या चोराच्या मुस्कटात मारलीत.!!!!!........
बाई : तो चोर आहे, हे मला नंतर कळलं, मला वाटलं आमचे हेच आहेत..
प्रेयसीचा हात धरला जातो तो प्रेमाने आणि बायकोचा हात धरला जातो तो स्वसंरक्षणासाठी.

चिंगी (घाबरत) : अहो, तुम्हाला एक गोष्ट सांगितली तर मारणार नाहीत ना.
नवरा : नाही ग, सांग ना.
चिंगी : मला बाळ होणार आहे.
नवरा : काय सांगतेस काय? हि तर चांगली बातमी आहे, ह्या बातमीला ऐकल्यावर कोणी मारेल का? तुला वाटला तरी कस.
चिंगी : नाही हो, कॉलेजला असताना मी असं आईबाबांना सांगितला होत, त्यावेळी त्यांनी खूप मारलं होत म्हणून.

डॉक्टर - तुमच्या नवऱ्याची स्मृती गेली आहे.
रेश्मा - यावर उपाय?
डॉक्टर - ज्या घटनेमुळे त्यांची स्मृती गेली आहे. ती घटना यांच्यासमोर पुन्हा घडविली पाहिजे.
रेश्मा - जा रे पिंट्या, स्वयंपाक घरातून लाटणं घेऊन ये.

संता: काय रे, बायको बरोबरचं भांडण मिटलं का?
बंता: हो. शेवटी आलीच माझ्या समोर गुढगे टेकवून...
संता: काय म्हणतोस? काय म्हणाली काय ती?
बंता: म्हणाली, "या बेड खालून बाहेर, नाही मारणार आता"

गर्दीत चालता चालता कुशाभाऊंचा एक मुलीला धक्का लागला.
कुशाभाऊ : sorry
मुलगी (फणकारून) : डोळे फुटलेत का?
कुशाभाऊ घाबरून गुपचूप तिचा मागून चालू लागले. एवढ्यात एका तरुणाचा त्या मुलीला धक्का लागला. तो पण sorry म्हणाला.
मुलगी (लाजत) : इट्स ओक.
कुशाभाऊ (दबकत) : माझ्या sorry च काय स्पेलिंग चुकीच होत?

बबनचा एका अपघातात कान फाटला. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून नवीन कान बसवला. दुसरया दिवशी..

बबन : डॉक्टर, तुम्ही बहुतेक बाई चा कान लावलात.
डॉक्टर : कशावरून?
बबन : मला ऐकायला व्यवस्थित येतंय, पण समजत काहीच नाहीये.

मन्या आपल्या नव्या आयटमला घेऊन दागिन्यांच्या दुकानात गेला. तिथे त्याने आयटमसाठी १ लाखाची हिरयाची अंगठी निवडली. दुकानदाराला म्हणाला मी तुला चेक देतो. उद्या तो वठला कि मी अंगठी घेऊन जाईन. मन्याची आयटम जाम खुश झाली. दुसरया दिवशी मन्या दुकानात गेला. दुकानदार फणकारतच म्हणाला, अहो साहेब तुमचा चेक bounce झाला.
मन्या : तो bounce होणारच होता, पण माझी कालची रात्र काय धमाल गेलीय, ते तुला नाही कळणार.

गुरुजी : मुलानो, मानवता हा सर्वात मोठा धर्म, माणुसकी दाखवली कि आपल्याला पुण्य मिळत, पुण्य मिळाल कि स्वर्गात स्थान मिळत. आता सांगा कोणाकोणाला स्वर्गात जायचं? चिंटू सोडून सगळी मुल हात वर करतात.
गुरुजी : का रे चिंटू, तुला नाही जायचं स्वर्गात?
चिंटू : आई म्हणालीय कि शाळा सुटली कि सरळ घरी ये. इथेतिथे भटकत बसू नकोस.

८००० रुपये टेलिफोन बिल आल्यामुळे बबन वैतागला होता, मी माझ्या ऑफिसचा फोन वापरतो मग एवढं बिल कस?
बायको : मी पण माझ्या ऑफिसचा फोन वापरते. मी कशाला घराचा फोन वापरू.
मुलगा : मला तर ऑफिसने सेलफोन दिलाय. मी कशाला घराचा फोन वापरू.
कामवाली : म्हणजे आपण सगळेच कामावरचे फोन वापरतो, मग एवढं बिल कस?

बायको : अहो डॉक्टर म्हणत होते माझ B. P. वाढलाय.
नवरा : अरे देवा.
बायको : अहो पण B. P. म्हणजे काय हो?
नवरा : अग B. P. म्हणजे बावळट पणा.

बंता : काय रे तू ऑफिसमध्ये तर एकदम वाघ असतोस, मग घरी गेल्यावर असा गप्प का होतोस.
संता : अरे यार, घरी पण वाघच असतो, फक्त दुर्गामाता, स्वार होते ना माझ्यावर.

मेरी आपल्या मैत्रिणीबरोबर वैवाहिक जीवनाबद्दल गप्पा मारत होती.
मैत्रिणी : प्रणयाच्या वेळी तू नवऱ्याशी बोलतेस का?
मेरी (आळस देत) : नाही ग, त्याने स्वताहून फोन केला तरच बोलते.

सकाळ सकाळ.....धौतीयोग चूर्ण ...घेऊन पण.... जर तुमचं पोट नीट साफ झालं नसेल...आणि शौचालयात अर्धा तास घालवून पण..कसं तरी होत असेल... तर तुम्ही कोणतं गाणं म्हणाल ....??
" जुदा होके भी ...............तू मुझमे काही बाकी है..."

एक श्रीमंत वकील गाडीने घरी चालला होता, एवढ्यात त्याला दिसलं कि रस्त्याचा बाजूला माणूस गवत खात आहेत.
वकील : तु गवत का खात आहेस?
माणूस : माझ्याकडे अन्न विकत घ्यायला पैसे नाही.
वकील : एक काम कर, माझ्या घरी चल.
माणूस : माझी बायकोपोर पण आहेत.
वकील : त्यांनापण बरोबर घे.
माणूस : साहेब, तुम्ही फार दयाळू आहात. आमच्यामुळे तुम्हाला उगाच भार.
वकील :छे छे, माझ्या बंगल्यातल गवत तर २ फूट वाढलंय.

दारूच्या नशेत मंग्या एक मोठ्या बारचा मुख्य दरवाज्यावर कसाबसा उभा होता,

त्याला बघून बारचा मालक म्हणाला 'मी काही मदत करू का?'
मंग्या : मला दारू हवी आहे.
मालक : तुम्ही आधीच खूप प्यायला आहात, त्यामुळे मी नाही देऊ शकत.
थोड्या वेळाने मंग्या दुसरया दाराने आला परत तोच प्रकार, असे २-३ वेळा झाल्यावर मालक म्हणाला 'मी taxi मिळवून देतो, घरी जा, शांत झोपा'
मंग्या (अडखळत) : आधी मला एक सांग, तू एका वेळी किती बार मध्ये काम करतोस?

Facebook addict असलेल्या चिंगीच लग्न झाल, सासरी आल्यावर सासरच्यांनी तिला नवऱ्याच नाव घ्यायला सांगितलं,
चिंगी : माहेर मी सोडलं, डोळ्यात पाणी साठवून.... मंग्याच नाव घेते, farmville ची neighbour request पाठवून.

बबनची बायको वारली अस समजून शेजारी तिला अंत्यविधीसाठी नेत होते, तिरडी जिन्यातून नेताना एकाचा पाय सरकला आणि तिरडी खाली पडली. बघतात तो काय बबनची बायको विव्हळत होती. लगेच डॉक्टर बोलावण्यात आला. डॉक्टरने सांगितलं हा चमत्कार आहे, पण अशा हि केसेस झाल्या आहेत. त्यानंतर बबनची बायको १० वर्षे जगली. १० वर्षानंतर जेव्हा परत ती वेळ आली तेव्हा तिला नेताना बबन दारातच ओरडला, यावेळी आपण लिफ्टचा वापर करू!

बबन बायको आणि सासूला घेऊन बँकेत गेला होता, त्याचा नंबर येणार एवढ्यात बँकेत दरोडा पडला.
बँक लुटून झाल्यावर त्यातल्या एकाने बबनच्या पुढच्या माणसाला विचारलं, तू मला दरोडा टाकताना पाहिलस का? तो म्हणाला 'हो', दरोडेखोराने त्याला तीथेच खल्लास केला. त्या नंतर त्याने बबनला विचारलं, तू मला दरोडा टाकताना पाहिलस का?
बबन : नाही मी नाही, पण माझ्या सासूने पाहिलंय तुम्हाला.

दारूच्या नशेत मंग्या ने बार मध्ये बसलेल्या बाई ला मिठी मारली. बाई ने भडकून त्याचा श्रीमुखात भडकावली, मंग्या लगेच माफी मागून म्हणाला, मला वाटल माझी बायकोच आहे. तू अगदी तशीच दिसतेस.
"अरे बेवड्या, चांडाळा, तुला लाज कशी वाटत नाही" बाई भडकून बोलली.
मंग्या : आयला, कमाल आहे, तू बोलतेस पण तिच्यासारखीच.

पिंकी : तुमच्याकडे मराठी शुभेच्छापत्रक आहे का ज्यावर लिहिला असेल "मी, फक्त तुझीच"
दुकानदार : हो आहे ना, हे बघा एकच राहील होतं.
पिंकी : अरे देवा. मला १ डझन हवी होती.

एकदा एक माणुस जोर जोरात टाळ्या वाजवत होता. दुसरा माणुस ते पाहुन म्हणाला
"का हो असे टाळ्या का वजवत आहात ?"
पहिला म्हणाला कि "टाळ्या वाजवल्या तर वाघ जवळ येत नाहि."
दुसरा "पण ईथे कुठे वाघ आहे?"
"येइलच कसा? मी टाळ्या वाजवतो आहे ना! " पहिला उत्तरला.

गाईड : नायगारा धबधब्या वर मी तुमचे सर्वांचे स्वागत करतोय. हा जगातील सर्वात मोठा धबधबा आहे. इथून कोसळणाऱ्या पाण्याची तीव्रता एवढी आहे कि एका वेळी १० लढाऊ विमान जरी आकाशातून गेली तरी कळत नाही. आता मी उपस्थित महिलांना विनंती करतो कि त्यांनी कृपया शांतता राखावी, जेणेकरून सर्वांना धबधब्याच्या आवाजाचा अनुभव घेता येईल.

गुरुजी : दिपू तुझ्या मागे वाघ लागला तर तू काय करशील?
दिपू : मी जोरात पळत सुटीन.
गुरुजी : तो पण जोरात पाळायला लागला तर?
दिपू : मग मी डोंगरावर चढीन.
गुरुजी : तो पण डोंगरावर चढला तर?
दिपू : मग मी डोंगरावरच्या झाडावर चढीन.
गुरुजी : ती तिथे पण चढला तर?
दिपू : मग मी पाण्यात उतरीन.
गुरुजी : तो पण पाण्यात उतरला तर.
दिपू (वैतागून) : गुरुजी, एक मिनिट, आधी मला हे सांगा कि तुम्ही नेमके कोणाच्या बाजूने? माझ्या कि वाघाच्या?

लिफ्ट मध्ये फटाकड्या पोरीने मंग्याच्या कानाखाली मारली. मंग्या हादरला, कारण त्याची बायको शांत उभी होती. आता घरी गेल्यावर आपल काही खर नाही म्हणून मंग्याने लिफ्ट मधून बाहेर पडल्या पडल्या बायकोची समजूत घालायला सुरुवात केली.
मंग्या : अग तुझी शप्पथ, खरच मी काहीच केल नव्हत!
बायको : हो मला माहित आहे. पण तू काही करू नयेस म्हणून मीच तिला चिमटा काढला.

गण्या नवीन नोकरीवर लागला होता. कामची पद्धत समजून घेतल्यावर त्याने चहा मागवण्यासाठी फोन लावला तो CEO च्या केबिनचा नंबर होता.
CEO : यस, कोण बोलतंय.
गण्या : Staff room मध्ये एक चहा पाठवा.
CEO (भडकून) : मूर्ख तुला माहित आहे तू कोणाशी बोलतोय. मी ह्या कंपनी चा CEO आहे.
गण्या हडबडला, त्याही स्थितीत स्वताला सावरत म्हणाला, तुम्हाला माहित आहे का मी कोण बोलतोय?
CEO : नाही
गण्या : वाचलो (गण्याने फोन आदळला)

गण्याचा गवताची पेंढी घेऊन जाणारा ट्रक्टर एक शेताजवळ उलटला. शेतकरी मदतीसाठी धावत आला.
शेतकरी : आता ते राहू दे तसच तू आराम कर, काही तरी खाऊन घे.
गण्या : धन्यवाद, पण बाबांना आवडणार नाही.
शेतकरी (आग्रहाने) : मी त्यांना समजावतो, तू ये आधी.
जेवण झाल्यावर गण्या म्हणाला आपण त्या गवताच्या पेंढी उचलुया का? बाबांना आवडणार नाही.
शेतकरी : बर ठीक आहे मी बोलतो तुझ्या बाबांशी, कुठे आहेत ते.
गण्या : गवताच्या पेंढी खाली.

एक बेवडा मध्यरात्री मित्राबरोबर घरी येतो, भिंतीवर एक घड्याळाच चित्र काढलं होत.
मित्र : अरे तू हे घड्याळाच चित्र का काढलं आहेस ?
बेवडा : अरे ते नुसत चित्र नाहीये, त्यातून आवाज येतो. बघ आता.
बेवडा जमिनीवर पडलेला हातोडा घेतो आणि त्या चित्रावर जोरात मारतो.
शेजारच्या घरातून आवाज येतो, ए बेवड्या पहाटेच ३ वाजलेत, झोप आता.
बेवडा : बघ, तुला बोललो होतो ना.

एका बाईला बोलणारा पोपट दुकानात स्वस्तात मिळतो.
बाई : बोलणारा असूनसुद्धा स्वस्त का?
दुकानदार : आधी हा एका कुंटणखान्यात होता, जास्त बडबड करायचा म्हणून आमच्याकडे विकला. बाई पोपटाला घरी घेऊन येते. घरी आल्यावर पोपटाची बडबड सुरु होते.
पोपट : नवीन अड्डा, नवीन बाई. थोड्या वेळाने तिच्या मुली शाळेतून घरी येतात.
पोपट : नवीन अड्डा, नवीन बाई. नवीन मुली.
संध्याकाळी तिचा नवरा घरी येतो.
पोपट : अरे गण्या, आज इकडे, अड्डा बदललास का?

बबन आपल्या बायको आणि सासू बरोबर फिरायला गेला होता. परतीच्या वाटेवर जंगलात त्यांची चुकामुक झाली आणि सासू हरवली. बरयाच वेळ शोधशोध केल्यानंतर एका ठिकाणी एक मोठा सिंह सासूच्या अंगावर गुरगुरताना दिसला.
बबन ची बायको : अहो काही तरी मदत करा.
बबन : मी काय मदत करणार, त्या सिंहाने स्वताहून आफत ओढवून घेतलीय, आता त्याच त्यालाच निस्तरु दे.

नवरा बायको एका हॉटेल मध्ये जेवत असतात, त्यांच्या शेजारच्या टेबलवर एक माणूस दारूच्या नशेत झिंगत असतो. बायको अधूनमधून त्याच्याकडे बघत असते.
नवरा : मी कधीपासून बघतोय, तुझ लक्ष त्या माणसाकडे आहे, तू ओळखतेस का त्याला?
बायको : होय, तो माझा पहिला नवरा आहे, ६ वर्ष झाली आमचा घटस्फोट होऊन, तेव्हापासून तो दारू प्यायला लागलाय.
नवरा : आयला, ६ वर्ष celebration, धमाल ना ?

एक दारुडा फुल टाइट होवून घरी निघालेला असतो. तेवढ्यात त्याला आग लागलेली बिल्डिंग दिसते. झाल ! दारुडा लोकांना वाचवायचे ठरवतो. तो बिल्डिंग मध्ये धावत जातो , आणि बऱ्याच वेळाने एका माणसाला जबरदस्तीने बाहेर काढतो ! पण सगळी लोक त्याची धुलाई करतात आणि त्याला पोलिसांकडे देतात. का ?
कारण तो ज्या माणसाला वाचवितो तो फायर ब्रिगेड चा माणुस असतो.

अस्सल मराठी आवडीची नाडी ओळखणारे दादा कोंडके सांगून गेलेत कि अश्लीलता विनोद लिहिणा-यात नसून,तो ऐकल्यानंतर त्यातून दुसरा अर्थ काढणा-याच्यात असते.कुणाकुणाला केळी,काकडी पाहिली कि खाद्यपदार्थ दिसतात आणि कुणाकुणाला आणखी काही....आता यात त्या केळी किंवा काकड्यांचा दोष आहे का?मग..विनोदात शील अश्लील शोधण्या ऐवजी तो करणा-याच्या बुद्धी चातुर्यास निर्भेळ मनाने दाद द्यायला शिका...

एक गवंडी जखम झाली म्हणून डॉक्टरकडे गेला.
डॉक्टर-इतकी मोठी जखम कशी झाली?
गवंडी-मी तिसर्या मजल्यावर शिडि लावून भिंत प्लॅस्टर करत होतो. समोर पाहिले तर एक सुंदर मूलगी आंघोळ करत होती अचानक शिडी पडली आणि मला जखम झाली.
डॉक्टर-अरेरे,त्याच वेळी शिडिला पडायचे होते.
गवंडी-अहो ५० माणसे त्या शिडीवर यायला लागल्यावर शिडि पडेल नाही तर काय?

काय यार, सगळा घोटाळा होऊन बसलाय!"
अस्वस्थपणे येरझारा घालत विन्या प्रधान बंडू बावळेला म्हणाला." एवढा काय घोटाळा झाला?"
" अरे मी बाप बनणार आहे.."
" अरे मग यात घोटाळा कसला. ही तर ग्रेट बातमी आहे, वंडरफुल!"
" बोडक्याची वंडरफुल बातमी! अरे गाढवा, हे माझ्या बायकोला कळलं तर केवढा तमाशा होईल!!"

दोघांचं भांडण झालं होतं. ती घुश्श्यातच होती.
रागानंच ती म्हणाली, ''मला माहीत आहे, मी मेले की तुम्ही लगेच दुसरं लग्न कराल.'
'मुळीच नाही!' नवरा उत्तरला....मी काही दिवस शांत आराम करीन...

नवरा - तुझी बहीण तुझ्या मानाने किती सुंदर आहे.
बायको - मग तिच्याशीच करायचे होते लग्न. मला कशाला गटवलीत?
नवरा - तीच म्हणाली ताईचे झाल्याशिवाय मी नाही जा...

एक स्त्री फळवाल्याकडे गेली स्त्री-जेवढी सडकी संत्री आणि मोसंबी असतील तेवढि काढुन या दुकानदाराला वाटले कि तशी फळे गायींना खाऊ घालायची असतील म्हणून दुकानदाराने तशी फळे निवडून एका टोपलित भरली स्त्री-आता उरलेल्या फळांचा योग्य भाव सांगा.

बायकोनी एका बोर्ड वरती लिहलेले वाचते.
नायलोन साडी रुपये ८/-
कॉटन साडी रुपये ५/-
बनारसी साडी रुपये १०/-
बायको : मला ५०० रुपये दया मला ५० साड्या घ्यचा आहेत.
नवरा : ये! अंधेळे! ते धोबीचे दुकान आहे.....

एक मुलगा बुलेट चालवत होता. त्याने एक्टिवावाली ला विचारले "कधी बुलेट चालवली का ?"
मुलीने स्पीड वाढवला व पुढे निघून गेली . मुलाने परत तिला गाठले आणि परत विचारले.
मुलीने स्पीड कमी केला आणि पाठी राहिली.
मुलगा पुढे जावून धड़कला , मुलीने विचारले " घे ,चालव अजुन बुलेट "
मुलगा : अरे तेच तर विचारत होतो ,याचे ब्रेक कुठे असतात ?

बाबा : बंड्या मी तुला गाडी घेऊन देईन बारावी पास झाला तरी आणि नापास झाला तरी...

बंड्या ( आनंदाने ) : खरोखरच बाबा ....!
बाबा : हो पास झाला तर नवीन स्प्लेंडर कॉ लेज मधे जायला आणि नापास झाला तर राजदूत सकाळची दुधाच्या पिशव्या टाकायला .............

एकदा दामुअण्णा रस्त्याने जात असताना एका बाईची अंत-यात्रा जात असते.. त्यात एक कुत्रा असतो आणि त्या मागे कुत्र्याची लांब रांग असते..
दामुअण्णा एका माणसाला विचारतो: ही काय भानगड आहे ..
तो माणूस उत्तरतो : या बाईला या कुत्र्याणी चावल्यामुळे या मरण पावले ..
दामुअण्णा : मला ही कुत्री मिळतील का?
तो माणूस : तुम्ही पण या रांगेत ...!

एकदा एका चड्डीला दवाखान्यात admit करतात , थोड्यावेळाने एक डॉक्टर तिला तपासायला येतात तर ते एकदम घाबरतात आणि त्यांना वाटते की ती चड्डी मेली आहे .असे का ?
कारण ती elastic ची चड्डी असते , त्यामुळे डॉक्टर ना तिची नाडी सापडत नाही!

छोटा झंप्या (ज्याचे ज्ञान अगाध आहे)
अशा झम्प्याला शिक्षक विचारतात , " झंप्या, पवित्र या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द सांग"
झंप्या थोडा वेळ विचार करतो आणि म्हणतो," राखी सावंत "
शिक्षक गडबडूनच जातात आणि म्हणतात..," धन्य आहेस तू !! आता मग या शब्दाचे थोडे समानार्थी शब्द पण सांग"
झंप्या लगेच उत्तर देतो, " शर्लीन चोप्रा आणि संभावना सेठ"

झंप्या कपाटात काहीतरी शोधत असतो..
बाबा: काय रे काय शोधतोयस ?
झंप्या: माझं पेन कुठे तरी हरवलेलं आणि माझा शर्ट पण सापडत नाहीये.
बाबा: अरे सारखं 'मी, माझं' असं करू नये...'आपलं' म्हणावं..
(काही दिवसांनी..Same scene)
बाबा: काय रे काय शोधतोयस ?
झंप्या: आपली चड्डी शोधतोय..

प्राध्यापिका बाई[आपल्या नव्या तरूण दाईला]-हे बघ ,बाळाला संध्याकाळी आठवणीने उद्यानात फ़िरायला घेऊन जा.
दाई-हो बाईसाहेब !
प्राध्यापिका बाई- आणि हो,एक गोष्ट लक्षात ठेव,कोणालाही बाळाचा पापा घ्यायला देऊ नकोस.
दाई-काळजी करू नका बाईसाहेब!अहो मी असताना बाळाचा पापा कोणी घेईलच कसा !

पहिला-माझे बाबा सुपरमॅन आहेत
दुसरा-माझे बाबा बॅटमॅन आहेत...
तिसरा-[काहीच न सुचल्याने ] माझे बाबा अंssss माझे बाबा ! हॉ ACP प्रद्युमॅन आहेत !

एक इंग्लिश माणूस डोंबिवलीला मराठी शिकायला आला आणि १५ दिवस राहिला..
फायनली तो २ वाक्य शिकला:
१. अरे वा! लाईट आले !!
२. च्या मारी, परत गेले !!